## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य



तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

(स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.org

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया



## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक



**वर्ष ८८ वे) प्रभुतरुण मुंबई, सोमवार, ता. १६ माहे जुलै, सन २०१२ (अंक ९९४**


*संपादकीय*

## भद्रम् भवतु सर्वदा!

**—सुहासिनी कीर्तिकर**

सतरा जूनची शकुन संध्याकाळ. एरवी मुंबईकरांना वाट पाहायला लावणारा पाऊस त्यादिवशी मात्र शुभशकुन देत बरसत होता. अंधेरीतील पाठारे प्रभु चॅरिटीज सभागृहामध्ये त्या पावसाला साथ देत स्नेहभावनेचा पाऊस पडत होता. मीदेखील या पावसात मनापासून सामील झाले होते. त्याला कारणही तसेच होते. पाऊस माझा मित्र आहे. पाठारे प्रभु चॅरिटीज ही संस्था इतरांप्रमाणेच माझीही सखी आहे; अन् सौ. नेत्रा आणि श्री. अजित मोरोबा विजयकर हे स्नेहशील दांपत्य माझे आत्मीय आहे. येथे जेव्हा 'माझा, माझी, माझे' असे मी म्हणते तेव्हा मला खात्रीच आहे की ही पाठारे प्रभुंचीच प्रातिनिधीक विशेषणे आहेत.

म्हणूनच तर त्या संध्याकाळी अशी अनेक प्रातिनिधीक विशेषणे श्री. अजित विजयकरांना मन:पूर्वक बहाल झाली ना!- श्री. अजित चॅरिटीज या संस्थेचे अध्यक्ष म्हणून कार्यतत्पर आहेत. धडाडीने निर्णय घेऊन तो प्रत्यक्षात राबविण्यात ते सर्व सहकाऱ्यांना आपल्या बरोबरीने वागवतात. ते चॅरिटीजच्या सेवेसाठी कोणतेही मूल्य न घेता स्वत:चा पैसा खर्च करतात. ते उत्तम वक्ते आहेत. ते कुटुंबवत्सल आहेत. जबाबदारीने आणि प्रेमाने ते वागतात. या सगळ्याला नित्य उपासनेची जोड देतात. अध्यात्मात रंगतात. म्हणूनच जसे बाहेरच्या जगात 'माणूस' म्हणून वावरतात आणि माणुसकी राखतात तसेच स्वत:च्या घरीही- अनेकानेक विशेषणे! ज्यातून नेहमीचे परिचित अजित अनोखेपणाने आणखी परिचयाचे झाले.

श्री. वीरपाल राणे, श्री. संदीप वेलकर, विद्यमान अध्यक्ष श्री. उदय शंकरराव मानकर यांनी सहकारी म्हणून श्री. अजित विजयकर यांच्या नेतृत्वाचे गौरवपूर्ण दर्शन घडवले. श्री. अजित, नेत्रांच्या स्नुषा गहिवरून आपल्या श्वशुरांच्या माणुसकीबद्दल 'अनुभवाचे बोल' बोलल्या. सौ. केतकी जयकर या माहेरून श्री. अजित विजयकरांच्या सहवासातील. कौटुंबिक जिव्हाळ्याने त्यांनी श्री. अजित यांच्या 'जितं मया'चे दर्शन घडविले. या दर्शनाचा आणखी सुंदर साक्षात्कार झाला तो अजित यांचे बंधू श्री. रंजन खंडेराव विजयकरांच्या भाषणातून. तेरा चौदाजणांची बालचमू विजयकरांच्या वास्तूत बागडणारी. त्यांचा म्होरक्या अजित. (अजूदादा!) गणपतीची आरास करणे, छोट्यांच्या सहली काढणे, त्यांचे असे 'बाल विकास मंडळ' चालवणे, घरच्या मोठ्या मंडळींकडून त्यास अर्थसहाय्य मिळवणे, संगीत-सिनेमाची आवड जोपासणे, पंगतीत हास्य फुलवत राहणे हे सगळे सगळे त्यांनी खुलवून सांगितलेच. पण केतकीनी सांगितलेला दीनदुबळ्यांची सेवा घरापासूनच सुरू करण्याचा अजित यांचा स्वभावही त्यांनी पुन्हा अधोरेखित केला. त्यांचा घरगडी धोंडूमामा शेवटी आजारी पडला; तर त्याची अथक सेवा श्री. अजित यांनी 'अजूदादा' या भूमिकेतून आपल्या कुटुंबातीलच एक धोंडू या भावनेने केली.

नवल नाही मग की घरापासून सुरू केलेला हा माणूसधर्म श्री. अजित यांनी पुढे विस्तारत समस्त पाठारे प्रभु

(पान २ कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## Kids Say The Darndest Things!

**—Mayura Nayak**

All of a sudden it feels like I have been plucked off from the intimidating conference rooms, and planted into a bright little kindergarten! Not sure if this is where I want to remain planted for the rest of my life, but I am surely having a ball with the cute little kiddies all around me! Well, my own amongst them are just two… … my two sons Shaurya and Vir! But they bring along so many kids into our home and thus in our lives, that currently my life is no less than a 24 hour playschool! It has been around six months that I am mostly in the company of kids, young and old. Courtesy my older son, who brings home all his friends to play, as if the newest addition to our family, my younger one is not enough, who is my loyal companion round the clock!

With Vir coming in our lives, my life has sure taken a 360degrees turn. Now I don't have to chase a Sales target, but I am chasing time, daily to complete my chores! No ruthless bosses around, but cute little angels (sometimes these angels also have small wicked thorns!) whose demands just don't seem to get over even with the end of the day! Exhaustive excel sheets, and sales projections, have been replaced with innumerous diapers, baby food, toys, vaccination tracks, etc. My 9hrs of work time has suddenly been extended to 24 hours for which I am not even being paid a salary, forget the over time! But at the end of everything, like all moms say the clichéd line….. I see myself using the same line here… "What these twinkling, innocent, and smiling eyes convey to you each day is simply priceless!"

Well, surely Vir has given me the opportunity once again to spend some quality time with my older son Shaurya too! But Shaurya need not use his twinkling mischievous eyes to convey his feelings, he can well express them through words, and at his age, kids say the funniest things with the most poker faces they can ever exhibit! His one liners just make this journey more joyous and fun. Here I share some of our conversations:

Me: Shaurya do you want a baby sister or a baby brother?
Shaurya: I only want a brother, no place for girls… If you get a girl, I will have to marry her when we grow up!

Then sometimes they throw such questions which are very difficult to answer!

Shaurya: Aai, when you were as old as me where was I?
Me: You were a star!
Shaurya: Then why couldn't I see you as a baby when I was a star, the way I can see all stars from here?

Then another touchy question…..

Shaurya: Now are you my mother or Vir's?
Me: I am yours as well as Vir's mother.
Shaurya: Mom, if you have two babies, why can't we have two mothers?

(I wonder what his dad has to say about his son's point of view)

These are just a few of our weird conversations, but when I hear him speak with his cousins, they are even more hilarious!

Shaurya: What happened to your great grandfather?

(पान २ कॉलम ४ वर)

(पान१ कॉलम २ वरून)

ज्ञातीयांच्या बाबतीत लागू केला. चॅरिटीजचे अध्यक्ष म्हणून त्यांचे सतत हित जपले. झाड फळांनी लदले की किती नम्र होते त्याचा साक्षात प्रत्यय अजित यांच्याकडे पाहिल्यावर येतो. कारण प्रत्येक बाबतीत मोठे कार्य करताना त्यांनी हा सुसंस्कृत मानवधर्म पाळला. संस्थेच्या कारभारावर काहींनी विरोधी वाक्‌बाण सोडले तर त्याला सबळ, उचित उत्तर देताना या अध्यक्षांनी आपला सुसंस्कृतपणा कधी सोडला नाही. या सुसंस्कृतपणामुळेच त्यांचा स्नेहपरिवार वाढला.

माझाच अनुभव सांगते. चॅरिटीजच्या संदर्भात अगदी छोटेखानी चार ओळी जरी वृत्त म्हणून ‘प्रभुतरुणा’त छापून आल्या तरी अध्यक्ष या नात्याने त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा त्यांचा फोन ठरलेलाच. एरवीही माझा लेख आवडला वा भाषण आवडले अगर प्रभुतरुणाचा दिमाखदार सोहळा झाला की त्याबद्दल पसंती दर्शविणारा त्यांचा फोन येतोच. मागील अंकातच मी श्री. मधुकर तळपदेंवर लिहिले; तेव्हाही हाच अनुभव आला. अध्यक्ष म्हणून हे सुसंस्कृत रीतीनेच झाले म्हणायचे. पण माणूस म्हणूनही सुसंस्कृतपणाचा सुखद अनुभव मला आलाय. पहिले मराठी विश्व साहित्य संमेलन सॅनहोजे येथे होणार होते तेव्हाची गोष्ट. मी त्यात महामंडळाची सदस्य म्हणून सामील होणार होते. एका सत्रात माझे विचारही मांडणार होते. पण...सुरुवातीला मला ‘व्हिसा’ नाकारण्यात आला. वृत्तपत्रांनीही त्याची मोठी बातमी केली. अशा वेळी मला धीर देणाऱ्यात श्री. अजित यांचा फोन होता. दुसरून अर्ज केल्यावर मला एकदाचा व्हिसा मिळाला! त्या ‘व्हिसा’साठी मी मुलाखतीला जाताना धीर देणारा पुन्हा फोन होता अजित यांचाच. ‘अहो, माझ्या मुलीलाही एकदा ‘व्हिसा’ नाकारण्यात आला होता. आता तुम्हाला मिळेलच.’ हे त्यांचे शब्द. त्यानंतर मध्ये दिवस अगदी कमी असल्याने महालक्ष्मीच्या ऑफिसमध्ये पारपत्र घेण्यासाठी धावपळ. प्रवासी संस्थेत ते दाखल करण्याची आणि पैसे भरण्याची धावपळ. या एका दिवसाच्या धावपळीत श्री. अजित यांचे चौकशी करून धीर देणारे किमान दोन तरी फोन येऊन गेले. वाटून गेले मला; की असा सुहृद मिळणे नाही!

‘प्रभुतरुणा’चे सुहृद म्हणून ‘तरुणा’च्या वर्धापनदिनी ते देणगी देतातच. पण माणुसकीची ही देणगी मोठी आहे. सौ. नेत्राही त्यांच्या या सर्व कार्याला अगदी सहजतेने ‘मम’ म्हणत असतात. चॅरिटीजच्या कार्यात अध्यक्ष म्हणून तब्बल तीन कार्यकाळ म्हणजे पाऊण तप यशस्वी कारकीर्द करणे येऱ्यागबाळ्याचे काम नोहे! म्हणूनच तर १७ जूनला गौरवसोहळा झाला ना? या सोहळ्यात अनेक भाषणांबरोबरच रंग भरला तो संगीतसमूहाने. सौ. आसावरी सुशील धुरंधर, सौ. रोनिका सचिन विजयकर या अजित यांच्या पुतण्या, तन्मयी सचिन विजयकर ही नात आणि चैतन्य कुणकावळेकर यांनी ईशस्तवन, गौरवगीत, पसायदान सुरेल सुस्वर केले. श्री. प्रदीप राणे, श्री. गिरीश छत्रे, श्री. गजानन मांद्रेकर यांनी या स्वरांना तालाच्या कोंदणात बसविले. डॉ. नीला अंजनीकुमार वेलकर यांच्या शब्दांना रसिकांच्या थेट काळजातच त्यांनी बसवले. डॉ. नीला यांची संस्कृत-प्राकृत (मराठी) अशी अजित यांचे शुभचिंतन करणारी प्रार्थना तर याचा कळसच. ती ऐकता ऐकता सर्वच रसिकांनी मनोमन ‘भद्रं भवतु सर्वदा’चा पुरुच्चार केला.

सौ. नेत्रा यांच्या वडिलांचा सुरुवातीला हृद्य सत्कार, सौ. मेधा वाझकर यांचे संचालन, देणग्यांचे वाचन आणि आभारप्रदर्शन अशी महिरप लाभलेला हा गौरव समारंभ श्री. अजित-नेत्रा यांच्या कार्याला साजेसाच होता. मात्र भावनेने भिजलेल्या चिंब भाषणांत वेळ रेंगाळत गेला. त्यामुळे शेवटी रंगणारी संगीत मैफल आटोपती घ्यावी लागली. एकदा स्वतंत्रपणे अशी मैफल सजावी आणि रसिकतेच्या सुरया तिने भरभरून ओसंडून जाव्यात असे वाटतेय. पाहूया कोण मनावर घेते ते!

चॅरिटीजच्या कार्यकारिणीचे नवीन अध्यक्ष श्री. उदय मानकर यांचेही अभिनंदन येथेच करणे प्रस्तुत. श्री. जगदीश गजानन कीर्तिकर यांचा या कार्यकारिणीत समावेश झाला. त्यांनाही शुभेच्छा.

भद्रम् भवतु सर्वदा!

(पान१ कॉलम ४ वरून)

Cousin: Aai said he has gone to heaven to meet GOD!

Shaurya: Arre you don’t know what that means, it means he is dead!

Cousin: I know that yaar, this is just what we should say, when someone dies!

And here we are, Adults – who think we can fool these kids. But these kids are far smarter than we can imagine.

Another funny conversation between Shaurya and his building friend:

Friend: Who is this person sitting on your sofa?

Shaurya: Hey! You don’t know? She is my mom!

Friend: Arre I always thought NIKITA (my maid) was your mom, because she accompanies you every day in the evening when we play in the compound!

What a transformation! From office politics, smart projections, and eternal chase of sales targets, here I am enjoying my kindergarten moments with my little ones. As much as I wish to get back to the grind, these moments will always be special. While we withstand the worst sarcasm from the board rooms, and gulp down the pressure of targets, our kids’ innocent one liners throw us completely off the track! Very often they casually speak the bitter truth which we as adults always know, but never want to confront. Their innocent questions and poker faced replies to our questions remind me of the once famous American comedy series hosted by Bill Cosby called "Kids Say The Darndest Things!" I always wondered what the word "Darndest" meant. Perhaps NOW I know the meaning of that word!

As I leave, one last time, here I share some funny pearls of "laughter" I came across while surfing the internet. ***A small boy is sent to bed by his father. Five minutes later..... 'Daad....' 'What?' 'I'm thirsty. Can you bring drink of water?' 'No, You had your chance. Lights out.' Five minutes later; 'Da-aaaad.....' 'WHAT?' 'I'm THIRSTY. Can I have a drink of water??' I told you NO! If you ask again, I'll have to spank you!!' Five minutes later......'Daaaa-aaaad.....' 'WHAT!' 'When you come in to spank me, can you bring a drink of water?'***

✳

# श्रीलंका आणि सध्याची नाजूक राजकीय परिस्थिती

**-अजित मानकर**

आपण हल्ली बातमी वाचलीच असेल की, श्रीलंकेमध्ये तुरुंगवास भोगत असलेल्या माजी सेनाधिकारी श्री. सनथ फोन्सेका ह्यांचा बंदिवास श्रीलंकेचे सर्वाधिकारी राष्ट्राध्यक्ष श्री. राजपक्षे यांच्या हुकूमावरून अचानक रद्द करण्यात आला व श्री. फोन्सेका मोठ्या सन्मानाने स्वगृही परतले. एलटीटीईच्या युद्धात श्री. फोन्सेकांच्या सेनेने शेवटी शेवटी अतुलनीय पराकाष्ठा करून या यादवी युद्धातून देशाला मुक्त केले व तेथील रक्तपात कायमचा थांबवला. वास्तविक श्री. फोन्सेका हे देशाचे भूषण ठरू शकले असते. पण नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकीत श्री. राजपक्षे यांच्या विरोधात ते टिकू शकले नाहीत. श्री. फोन्सेका हे आपणांस नंतरही डोईजड होऊ शकतात या विचारांनी तात्काळ परत सत्तेवर येताच श्री. फोन्सेका यांच्याविरुद्ध लाचलुचपतीच्या व पैशांच्या घोटाळ्यांच्या आरोपावरून राष्ट्राध्यक्षांनी आपले विशेषाधिकार वापरून त्यांना अटक करविली.

मी दोन महिन्यांपूर्वी श्रीलंकेचा महिनाभर सखोल दौरा केला व अनेक स्थानिकांशी या विषयावर बोललो. सर्वसाधारणपणे लोकांचा श्री. फोन्सेकांच्याबद्दल फारसा आदराचा भाव आढळला नाही जरी त्यांनी लंकेमध्ये संपूर्ण शांती एलटीटीईचा पाडाव केला होता. लष्कराने बऱ्याच निरपराध तामिळी बांधवांची हत्या केली होती कारण एलटीटीई त्यांचा संरक्षक छत्र म्हणून ढालीसारखा वापर प्रत्यक्ष युद्धात करत होते. सर्वसाधारण लोकांना तामिळी ज्याप्रकारे मारले गेले त्याचे फारसे दु:ख जाणवले नाही. फक्त या प्रकारात मूठभर बौद्ध भिक्षूकदेखील लष्कराची शिकार ठरले होते. फक्त या बौद्ध भिक्षू हत्याप्रकरणाने संपूर्ण सिंहली जनता श्री. फोन्सेका आणि सैन्याबद्दल नाराजी व्यक्त करताना आढळत होती. कदाचित या एकाच कारणाने श्री. फोन्सेका यांना राष्ट्रपतीच्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला असावा. भारतासाठी मात्र हा त्यांचा पराभव महागात पडला आहे, कारण श्री. फोन्सेका यांची मते संपूर्ण भारतधार्जिणी होती.

श्री. राजेपक्षे यांचे सध्याचे सरकार भारत सरकारच्या संपूर्ण विरोधाचे व चीनी सरकारशी अत्यंत सलोख्याचे धोरण गेली काही वर्षे राबवत आले आहे. सध्या लंकेत भारताचा राजकीय दु:स्वास अनेक कारणांनी करण्यात येतो. मुख्य म्हणजे तेथील अनेक पिढ्यांपासून वास्तव्यास असलेले भारतीय वंशाचे तामिळ भाषिक, ज्यांना अजूनपर्यंत दुय्यम दर्जाचे नागरिकत्व अनुभवास मिळत होते त्या तामिळींच्या जाफना भागात ना रस्ते, पाणी, नोकऱ्या, शिक्षण, वैद्यकीय सुविधा, कुठल्याच सोयीसुविधा आतापर्यंत लंका सरकारने पुरवल्या नव्हत्या व म्हणून एलटीटीईचा असंतोष सतत धगधगत होता. आता मात्र युएनओच्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर श्रीलंकेची भारत व अमेरिकेतर्फे एप्रिल महिन्यात पूर्ण नाकेबंदी करण्यात आली आहे व पुढील एका वर्षात तामिळींना काय सोयीसुविधा उपलब्ध केल्या जाणार आहेत ज्यावर युनो देखरेख ठेवणार आहे. जर का श्रीलंका सरकार तामिळींना योग्य न्याय देऊ शकले नाही तर पुढे युद्धातील मानवताविरोधी हत्यांबद्दल श्रीलंकेला हेग येथील आंतरराष्ट्रीय न्यायासनासमोर उभे राहण्याची नामुष्की ओढवू शकते. श्री. राजेपक्षे यांच्या सरकारचा भारतावरचा रोष जास्तच वाढला आहे कारण भारताने श्रीलंकेच्या विरोधात युनोत गेल्या एप्रिलमध्ये मत दिले की ज्यायोगे युद्धकालीन कत्तलीमुळे श्रीलंका

(पान ५ कॉलम ३वर)

लेखांक-७

# कालची मुंबई-आजची मुंबई

**— विश्वास नारायण अजिंक्य**

जिच्यावरून या शहराला ''मुंबई'' हे नाव मिळाले त्या मुंबादेवीचे पहिले देऊळ बोरीबंदर स्टेशनच्या जागेत होते. तिथून ते १७३७ मध्ये इंग्रजांनी हलविले व आजच्या जागी पांडू सोनार नावाच्या धनिक व्यापाऱ्याने सरकारच्या हुकुमावरून उभे केले.

१८४५ पर्यंत माहीमची खाडी पार करण्यासाठी होड्या, नावांचा उपयोग केला जात असे. माहीमची ही खाडी खडकाळ व उथळ असल्यामुळे पुष्कळदा नावा फुटून किंवा उलटून अपघात होत असत. १८४१ मध्ये पावसाळ्यात १५-२० नावा उलटून बरीच माणसे दगावली. तेव्हा माहीमच्या खाडीवर पूल बांधण्याच्या विषयाला चालना मिळाली. जमशेटजी जीजीभाईंच्या पत्नीने दिलेल्या १ लाख ४७ हजार रुपयांच्या देणगीतून १८४५ मध्ये हा पूल बांधून पूर्ण झाला व लोकांची सोय झाली. म्हणूनच दादरहून माहीमला जाणाऱ्या रस्त्याला लेडी जमशेटजींचे नाव देण्यात आले आहे. पेशवाई बुडाली त्याच वर्षी मुंबईच्या रस्त्यांवर मैलाचे दगड बसले; तर रस्त्याच्या डाव्या बाजूने जाण्याची शिस्त १८२३ पासून लागू झाली. मुंबईचे सर्व रस्ते दिवसातून दोन वेळा साफ केले जात आणि आठवड्यातून एकदा सर्व रस्ते पाण्याने धुतले जात असत. आग विझवण्याच्या होज पाईपच्या माऱ्यामुळे रस्ते स्वच्छ होत असत; तसेच पाण्याच्या माऱ्यामुळे उंदीर घुशी मारल्या जात. त्यामुळे सफाई कामगारांना रोख बक्षीस मिळे. हे धुण्याचे काम पहाटे सुरू होई व सकाळी ९ वाजेपर्यंत चाले. १९५० नंतर रस्ते धुण्याचे काम बंद झाल्यावर रोज संध्याकाळी रस्त्यावर पाणी शिंपडले जात असे. कालांतराने पाणी टंचाईमुळे रस्ते धुणे किंवा त्यावर पाणी शिंपडणे महापालिकेने थांबविले. तेव्हापासून मुंबईत पाऊस पडतो तेव्हा रस्ते काही तास स्वच्छ होतात तेवढेच!

''मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय'' या संस्थेचा जन्म १८९८ साली नारळी पौर्णिमेला झाला. संग्रहालयाचा प्रारंभ एका खासगी लहानशा खोलीत झाला. सुरुवातीला त्याचा चरितार्थ वर्गणी व अधून मधून नाटक-सर्कसवाल्यांकडून मिळणाऱ्या देणगीतून चालत होता. बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या सहा हजाराच्या देणगीत शिल्लक रकमेची भर घालून संग्रहालयाची पहिली छोटीशी इमारत भाई जीवनजी लेनच्या टोकावर उभी राहिली. तर १९३५ साली डॉ. भालेरावांनी ''मुंबई मराठी साहित्य संघ'' ही संस्था अस्तित्वात आणली व तिच्यासाठी आपले आयुष्य आणि कर्तृत्व पणास लावले. केळेवाडीतील ''मुंबई मराठी साहित्य संघा''ची इमारत व त्यातील नाट्यगृह सर्वांच्याच परिचयाचे आहे.

विठ्ठलदास ठाकरसी नावाचे एक धनिक उद्योगपती मुंबईत होऊन गेले. स्त्रियांच्या उन्नतीला उपयोगी पडणाऱ्या अनेक संस्थांना मदत करता करता त्या ध्येयाला एक रकमी पंधरा लाख रुपयांची देणगी देऊन त्यांनी त्याला अखिल भारतीय मूर्तरूप दिले. १९१८ हे संपूर्ण वर्ष त्यांनी जगप्रवासात घालविले. जपानमधील 'स्त्रियांचे विद्यापीठ', त्यांचे सर्व कार्यक्रम नजरेखाली घालून भारतीय स्त्रियांसाठी अपरिहार्य व उपयुक्त अशा शिक्षणासाठी ''श्री नाथीबाई दामोदर ठाकरसी'' महिला विद्यापीठाची स्थापना केली.

मुंबईत गिरण्या व कारखान्यांची वाढ झाल्यावर कारखान्यात राबण्याकरिता बायकामुलांना खेड्यात ठेऊन पुरुषवर्ग मुंबईत आला. याच चाकरमान्यांसाठी निवाऱ्याची सोय म्हणून चाळी बांधण्यास सुरुवात झाली. व त्यांच्याकरिता खाणावळी निघाल्या. खाणावळीप्रमाणेच चहा-कॉफीची दुकाने निघाली. फक्त ब्राह्मणांच्या खाणावळीसुद्धा होत्या. त्याकाळी समाजात सोवळ्याचे एवढे प्रस्थ होते की खाणावळीत देखील ओवळ्याने कोणी जेवावयास बसत नसे. धूतवस्त्र किंवा कांबळ यापैकी काहीच जवळ नसेल तर मग ओला पंचा परिधान करून तो जेवी. पुढे एखादाच ओवळ्याने जेवणारा 'हरीचा लाल' निघू लागला. पण त्याला बाजूला पंक्तीला बसावे लागे. सोवळे लोक अशा माणसाला स्वत:च्या जातीचा असला तरी आपल्या पंक्तीला घेत नसत. पुढे अशा ओवळ्या लोकांची संख्या फुगत जाऊन एवढी वाढली की त्यांची मुख्य पंगत बनून सोवळ्या लोकांना निराळ्या पंक्तीला बसावे लागले. पुढे सोवळ्या ओवळ्यांना एकत्र पंक्तीला बसण्यास निर्बंध राहिला नाही. आज एकही माणूस सोवळे परिधान करून खाणावळीत जेवत असलेला दिसून येत नाही. अलीकडील मुलांना तर सोवळे म्हणजे काय हेच ठाऊक नसेल. तीच गोष्ट मिशी आणि शेंडीची. आईबाप जीवंत असताना आपल्या मिशीला वस्तरा लावणे म्हणजे जन्मदात्याच्या मानेवरच घाव घालण्यासारखे होते. त्याकाळी वडील वारल्यावर मिश्या काढण्याची पद्धत होती. त्यामुळे ओठांवर मिश्या व कपाळी गंध न दिसल्यास ''काय रे तुझा बाप मेला का?'' असा प्रश्न विचारला जात असे. हल्ली बापादेखत रोज सकाळी मुलगा आनंदाने स्वहस्ते मिशी उतरवीत असतो. कधी बाप-लेक दोघेही शेजारी शेजारी बसून तेच करताना दृष्टीस पडतात.

१८८१ साली प्रथम उत्तर प्रदेशातून मुंबईत धोबी आले व उत्तरप्रदेशातून आलेल्यांना ''भय्ये'' म्हणण्याची प्रथा पडली. मोठ्या प्रमाणावर कपडे स्वच्छ धुवून, वाळवून त्यांना इस्त्री करणाऱ्या घरगुती उद्योगाचे पुढे व्यवसायात रूपांतर होऊन त्यांची दुकाने काढण्यास भय्यांनी सुरुवात केली. मुंबईकरांना दूध पुरवठा करणाऱ्या व्यवसायात तर भय्यांनी वर्चस्व निर्माण केले. १९४० पर्यंत कुलाब्यापासून बोरीवलीपर्यंत भय्यांचे तबेले दिसत असत. त्यानंतर सार्वजनिक आरोग्याला ते बाधक आहे असे कारण देऊन मुंबई महापालिकेने ते शहरातून उपनगरात हलविणे भाग पाडले. १९७६ नंतर बरेचसे तबेले गोरेगावातील आरे वसाहतीच्या जुगलपट्टीत हलवण्यात आले.

१९५६ साली महाराष्ट्र आणि गुजरात मिळून द्विभाषिक ''मुंबई राज्य''अस्तित्वात आले. त्यावेळी मराठवाड्यातील निजामाच्या हद्दीतील जिल्हे मुंबई राज्याला जोडले गेले. त्यावेळी तेथील सरकारी कर्मचाऱ्यांनी हैद्राबादपेक्षा मुंबई राज्याला पसंती दिल्यामुळे अनेकांच्या सेवा मुंबई राज्यात स्थलांतरीत करण्यात आल्या. मुंबईत नव्याने बदली झालेल्या तसेच राज्याच्या सेवेत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवासाची व्यवस्था करण्याच्या हेतूने वांद्र्याच्या खाडीजवळील खाजणात भराव टाकून मिळविलेल्या १२६ एकर जमिनीवर घरे बांधली गेली. ही वसाहत ''शासकीय वसाहत'' म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाने साहित्यिक, पत्रकार, कलाकार व वास्तूशास्त्रज्ञ तसेच अभियंते यांना वांद्रे (पूर्व) येथे भूखंड दिला व त्यांची घरे उभारली गेली. कलाकारांच्या घरांची वसाहत ''कलानगर'' म्हणून ओळखली जाते.

फाळणीनंतर मुंबई शहरात आलेल्या निर्वासितांसाठी शासनाने चेंबूर, सायन, उल्हासनगर येथे संक्रमण शिबिरे बांधली. मुंबईच्या काँग्रेस मंत्रीमंडळातील बांधकाममंत्री गुलजारीलाल नंदा यांनी ''द बॉम्बे हाऊसिंग बोर्ड'' या भारतातील पहिल्या गृहनिर्माण संस्थेची स्थापना १५ जानेवारी १९४९ रोजी केली. १९५० साली खार या उपनगरात ''रामकृष्ण नगर'' ही पहिलीच गृहनिर्माण वसाहत ''बॉम्बे हाऊसिंग बोर्ड''तर्फे तयार झाली. १ मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्राचे एकभाषी वेगळे राज्य अस्तित्वात आल्यावर ''बॉम्बे हाऊसिंग बोर्ड''चे रूपांतर ''महाराष्ट्र गृहनिर्माण'' संस्थेत झाले. या संस्थेतर्फे उभारण्यात आलेली सुमारे १०५०० निवासी गाळे असणारी विक्रोळी येथील ''कन्नमवार नगर'' ही देशातील पहिली मोठी गृहनिर्माण वसाहत, तर गावदेवीमधील आजची ''सारस्वत हाऊसिंग सोसायटी'' ही सहकारी तत्त्वावर उभी राहिलेली मुंबईतील पहिली गृहरचना होय.

*

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



# YUVA MANCH

Together Towards Tomorrow

**Prabhu Tarun Website :** prabhutarun.org

A request to all members who have registered for the Prabhu Tarun website to kindly provide their email IDs once again to us, so that we can provide you with your new user IDs.

## Desai'cively yours

**-Mrs. Anuradha Simit Desai**

Baabul ki duvayen leti ja, ja tujhko sukhi sansaar mile…

True, we have come a long way from those times, but the sentiment does not change. My sister, Vaijayanti, got married last month, and I got a preview of the emotional turmoil the mother of a bride goes through.

Marriages are largely joyful occasions, as this one was too. Adding to the inherently joyful occasion was the presence of our near and dear ones who had taken great efforts to be with us. Cousins, uncles and aunts adjusted office, home, school schedules, overcame health issues, a cousin postponed her return abroad, another travelled with a toddler, all to be there with us, adding colour to the proceedings. Yet who can ignore the tug at the heart, the lump in the throat, the piquancy of the moment when the bride leaves with the groom after the wedding? The feeling is difficult to comprehend, as the rational mind knows that this is the natural order of things, that in fact this is a very happy time, that there is nothing to be apprehensive about, yet…the mind is a mixture of emotions.

The little girl from yesterday is stepping into a whole new world, full of promises but uncertain. If only wishing with all my heart and praying with all my might would be enough to keep her safe and happy. If you have read 'The Breaking Dawn' the last of the Twilight trilogy (the vampire series) you will know that Bella, the (crazy) protagonist (human intent on transforming into vampire, it's all about looove apparently!), has the special gift of radiating a shield that can protect her loved ones from harm. If only we had the power to protect our loved ones through sheer force of will.

I really envy the uncomplicated emotions of my daughters. Ads is very clear that the occasion that has taken her "Ma" away from her can be no good. She had refused to believe in the reality of the event till the actual day dawned and then she refused to leave Ma's side throughout the ceremony. Abs on the other hand could not be more pleased at the opportunity to do even more "danga" than usual, meet all her relatives, and generally have fun. God bless her. I undergo similar emotions as I watch her grow, she now goes to Nursery, and is becoming more independent.

One straight line, and two little bumps, she has learnt to write B. Yes, I want her to grow up, grow strong, learn all that there is, excel at everything she does, win all the PP Charities prizes J, but on the other hand, I want to clutch her to my heart, squeeze the living daylights out of her, not let her go, (can I eat her up?), stop this moment from passing, stop time… Highly irrational, I know, I know…

It is this mix of emotions that is intriguing and that makes life so interesting.

What we call the beginning is often the end. And to make an end is to make a beginning. The end is where we start from.

-T.S.Eliot

It is this end that leaves a tinge of sadness, no, not sadness, but an un-named unsettled feeling. So be it the end of a carefree, single life, or the end of always being surrounded by loved ones, it marks the beginning of a new life holding hands with a soulmate, the opening up of a world of opportunities, and promises and possibilities.

Begin at the beginning and go on till you come to the end: then stop.

-Lewis Carroll, Alice in Wonderland.

It is that simple really, it is the journey that is important, live every moment to the fullest and treasure it, and it will be a full life.

## Funny Quotes

1. What is the difference between Einstein and Karunanidhi?
   Einstein said that everything is relative where as Karunanidhi says that relative is everything
2. Why is Bangladesh not sending a contingent to Olympics?
   Because anyone who can run,jump or swim, has already crossed the border of the country
3. Why did UPA Government demonetise 25 paise coins?
   They could not manage one Anna, how could they manage four annas?
4. Vote for Baba Ramdev. He will be the PM who can help you make your ends meet.
   Your head and toe, that's it.
5. Some days, Digvijay Singh makes no sense.
   Other days, he is silent.
6. I really do not understand why people consider alcohol to be a problem.
   Chemically speaking, it is a solution.
7. A documentary on Air India's planes -
   " Saare Zameen Par".

**-Mr. Simit SubhashDesai**

### Bol Baby Bol:

I was greeted one evening by this poem made by Ads, who has since become a budding poetess, and somewhat on the lines of Kuhu from "Eka Lagnachi Dusri Goshta" finds more and more occasions to express herself in verse. The poem itself has gained the status of an anthem of sorts, being recited by both sisters at all possible times. Tell me if you like it...

**पाऊस पडला रिम झिम झिम**
**आम्ही सगळे भिजलो चिंब**

**छत्री घेऊन बाहेर पडलो**
**तरीही चिंब भिजलो**

**माझी आजी मला ओरडली**
**''का गं भिजून तू आली?''**

**''छत्री गेली उडून...**
**मी आली भिजून.''**

**वाह रे पावसा,**
**खूप आली मज्जा...**

In line with the earlier thoughts...Jevha bobde bol samptat, tevha kavita ugavte..., nahi ka?

लेखांक ७

# चिमणीच्या दातांनी

## वाचाल तर वाचाल!

-कल्पना सुभाष कोठारे

एका इंग्रजी पुस्तकाने माझ्यावर अगदी गारूड केले आहे. इतरांना या पुस्तकाविषयी भरभरून सांगून झाले, तरीही मनाचे काही समाधान झाले नाही. मग ना; पुस्तकाचा मराठी अनुवाद करावयास घेतला. एका मैत्रिणीने आधीच प्रकाशित झालेली, त्या पुस्तकाची मराठी प्रत हाती ठेवली. पेन बाजूस ठेवून मी तो मराठी अनुवादही अधाशासारखा वाचला. प्रत्येक पुस्तकप्रेमीने हे पुस्तक वाचावयाला हवे असे वाटले. म्हणून इथे फक्त त्या पुस्तकाच्या चाखण्यापुरता नमुना देत आहे.

इंग्रजी पुस्तकाचे नाव, 'द सिक्रेट' असून मराठी अनुवादाचे नाव 'रहस्य' आहे. न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा शोध लावला. गुरुत्वाकर्षण दिसत नाही परंतु ते आहे हे आता सर्वमान्य आहे. तसेच, या पुस्तकातून सांगितलेले 'आकर्षणतत्त्व' हे दिसत नाही. परंतु आहे हे निश्चित! आपल्या प्रत्येकाच्या जीवनाचे 'रहस्य' म्हणजे हे आकर्षणतत्त्व होय.

हे पुस्तक सांगते की, ज्याप्रमाणे ध्वनिलहरी दिसत नाहीत, परंतु असतात तशाच विचारलहरी दिसत नाहीत, परंतु असतात. जेव्हा सातत्याने एखादा विचार तुम्ही करता तेव्हा ती लहर त्या वस्तूस आकर्षित करते. एखाद्या चुंबकाप्रमाणे तुमची विचारलहर त्या वस्तूस तुमच्याकडे खेचून आणते. मात्र, रेडिओच्या सुईप्रमाणे तुमची विचारलहर त्या एकाच वस्तूवर स्थिर राहवयास हवी. एकाचवेळी दोन किंवा अधिक प्राप्य वस्तूंचा विचार नको.

उदाहरणार्थ समजा, एखाद्यास एक बंगला पाहिजे. जागा, वेळ, पैसा यापैकी त्याच्याकडे सध्या काहीही नाही. परंतु तो सतत त्या बंगल्याचाच विचार करीत राहिला, कल्पनेने तिथे वावरूही लागला, तर एक ना एक दिवस त्याची इच्छा पूर्ण होईल. समजा एखाद्याला धन हवे असेल तर त्याने सध्याच्या पैशाच्या कमतरतेचा विचार न करता, येणाऱ्या समृद्धीचा सतत ध्यास घेतला तर आश्चर्यकारकरित्या पोस्टबॉक्समध्ये एखादा चेक येतोच! मात्र एकाग्रता हवी. धन मिळणारच. मी त्याचा विनियोग असा करीन असे कल्पित राहिल्यास धन आकर्षित होऊन येते. इतकेच काय, 'मी बरा होणारच, बरा झाल्यावर अमूक एक करणारच.' अशी विचारधारा रोग्यास रोगमुक्त करते.

आनंद,कृतज्ञता, प्रेम या गोष्टी आकर्षणतत्त्वास उपयोगी, पूरक आहेत. (इथे साईबाबांची श्रद्धा व सबुरी आठवते.)

हवे ते रेडिओस्टेशन लावण्यासाठी काटा ठराविक जागी आणावा लागतो. तद्वतच तुमच्या मनाचे विचार जर 'प्रेम' या अत्युच्च भावनेवर स्थिर असतील तर नकोसे विचार, हेवेदावे, भांडणे, शारीरिक दु:खे, नकोशा आठवणी दूर राहतात. तुमच्या ट्रान्समिशनचा मनोरा फक्त हव्या त्याच विचारलहरी आकर्षित करते. वीज खेळवली जावी तशी तुमच्यातील उर्जा बाहेर पडून हवी ती ऊर्जा आकर्षित करून घेते. जीवनातील जुन्या समस्या, सांस्कृतिक, सामाजिक बंधने झुगारून देऊन हवे ते मिळविणे हे एकच लक्ष्य बाळगणे केवळ तुमच्याच हाती असते. (इथे मला 'यु आर द आर्किटेक्ट ऑफ युवर ओन फॉर्च्युन' या वचनाची आठवण झाली.)

आकर्षणतत्त्वाचा उपयोग करून कॅन्सरवर एका स्त्रीने कशी मात केली, दुसरी स्वत:च्या कल्पनेतील फ्लॅट मिळविण्यात कशी यशस्वी झाली- अशा अनेक सत्य कहाण्यांचा या पुस्तकात नावे व फोटोसह उल्लेख आहे. अनेक वैज्ञानिक, धर्मगुरू, तत्त्वज्ञानी, शिक्षणतज्ज्ञ, डॉक्टर्स, उद्योगपती अशा मान्यवरांच्या अनुभवाचे संकलन लेखिका ब्रेन्डा बायरनने या पुस्तकात केलेले आहे. वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी मुख्य मुद्याचे संकलन आहे. या मुद्यांचे वेगळे पुस्तकही उपलब्ध आहे. अनेक भाषात ही दोन्ही पुस्तके भाषांतरित झालेली असून जगभर सीडीज् रूपातही ते पोचले आहे. टाईम्स ऑफ इंडिया वाचण्यालायक पुस्तकांची यादी देते. त्यातही या पुस्तकाचे नाव होते. मनातील कल्पना आकर्षणतत्त्वाद्वारे सत्यात उतरविता येतात असे हे पुस्तक सांगते. आकर्षणतत्त्वांची प्रचिती आलेल्याचे अनुभव वाचून आपणही स्वत:चा फायदा करून घेऊ शकतो.

माझ्यापुरते सांगायचे झाले तर एकच उदाहरण देते. सध्या दूरदर्शनवर चालू असलेली मालिका पाहताना मला शाळेतील एक धडा आठवला. तो ज्या मूळ पुस्तकातील होता ते पुस्तक मी पूर्ण कधीच वाचले नव्हते. लक्ष्मीबाई टिळकांच्या 'स्मृतिचित्रे' या पुस्तकातून तो धडा घेतलेला होता. 'स्मृतिचित्रे' वाचण्याचा ध्यास मी घेतला आणि काय आश्चर्य! एका मैत्रिणीने निवृत्तीनंतर ते विकत घेतल्याचे कळले. मला तिने ते वाचण्यास दिले आहे. १९३४ साली लिहिल्या गेलेल्या मराठीतील पहिल्या आत्मचरित्राची २००० मधील चौथी आवृत्ती मी २०१२ मध्ये वाचून एन्जॉय करीत आहे. त्याचे रहस्य 'रहस्य' या पुस्तकातच दडले आहे. तुम्ही 'रहस्य' किंवा 'द सिक्रेट' वाचाल तर नक्कीच वाचाल!

*

---

(पान २ कॉलम ३ वरून)

सरकार काळ्या यादीत जाऊन संपूर्ण जगासमोर अडचणीत आले आहे. सबब, भारताच्या कुठल्याही मैत्रीचा स्वीकार करायला श्री. राजपक्षे अजिबात तयार नाहीत. फक्त जाफना या तामिळींच्या भागातच घरे बांधणे, शाळा व इस्पितळे बांधणे, पाणी व वीज पुरवठा यासारख्या प्रकल्पात भारत सरकारला परवानगी आहे. मात्र तेल व खनिज पुरवठा, मोटारींचा कारखाना, बंदर उभारणी, मोठमोठे विद्युत प्रकल्प, रेल्वे उभारणी, हायवे आणि एक्सप्रेस वे या सर्वांची कंत्राटे संपूर्ण लंकेत सध्या फक्त आणि फक्त चीन सरकारलाच बहाल करण्यात आलेली आहेत. त्यानिमित्ताने पूर्वी कधीही दिसली नाहीत ती चीनी माणसे आज प्रचंड संख्येने संपूर्ण लंकेत मुक्त संचार करीत आहेत. मला तर असेच वाटले की पुढल्या काही वर्षात चीनी माणसाचे श्रीलंकेतील प्रमाण हे सध्याच्या न्युझिलंड किंवा अमेरिकेशी मिळतेजुळते होईल. म्हणजेच ५० टक्के सिंहली व ५० टक्के चीनी!

श्री. राजपक्षे सरकारचा भारतावरचा पोटशूळ इतका उफाळला आहे की भारत सरकारच्या स्वत:च्या भौगोलिक अधिकारातील दोन प्रकल्पांनाच ते सरकार आता प्रचंड विरोध करताना आढळत आहे. हे दोन प्रकल्प म्हणजे भारताद्वारे सेतूसमुद्रधुनीतून जहाज वाहतुकीसाठी खुला करण्याचा पर्यायी मार्ग जेणेकरून कोचिनहून विशाखापट्टणमला पोहोचण्यासाठीचा श्रीलंकेला वळसा घालून जाण्याचा द्राविडी प्राणायम भारतीय जहाजांना व विशेष करून भारतीय नौदलाला; विशेषत: युद्धकालात करावा लागू नये व दुसरा जो कलपकम येथे भारत सरकार अणुप्रकल्प उभारण्याच्या प्रयत्नात आहे तो कदाचित पुढेमागे ही प्रकरणे श्रीलंका सरकार हेगपर्यंत नेण्याचा प्रयत्नदेखील करू शकते जेणेकरून हे प्रकल्प अजूनही पुढे बराच काळ रखडवले जाऊ शकतात.

श्री. फोन्सेका यदाकदाचित पुढील निवडणुकीत श्री. राजपक्षे यांचा पराभव करून राष्ट्राध्यक्ष झाले तरच वरील परिस्थिती कदाचित निवळू शकते. पण अर्थातच तोपर्यंत फार उशीर झाला असेल. कारण तोपर्यंत चीन सरकारने श्रीलंकेला पुरते मांडलिक केलेले असेल. हीच तर भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणाची शोकांतिका आहे!

*


**MAHABALESHWAR**

*COME HERE TO EXPERIENCE NATURE AT ITS BEST WITH JASMINE COTTAGE*





**THE COTTAGE OFFERS 4 SPACIOUS ROOMS . IT PROVIDES ACCOMODATION FACILITIES TO SUIT THE BUDGET OF THE TOURIST**

**ALL THE ROOMS HAVE SERENE ENVIRONMENT AND OPEN SIT-OUT VARANDA WHERE GUESTS CAN SIT AND ENJOY THE PLEASANT BEAUTY OF THE NATURE**

**FACILITIES:**

* Attached bath
* Hot & Cold Running water
* Television with Satellite Connection
* Car Parking
* Large open area for playing outdoor games

**Location:**

It is located near the market in Mahabaleshwar within close proximity of bus stand in the gorgeous land of Mahabaleshwar.

**For Booking Contact:**
**Velkars 9930172689 9220451465**

## प्रभुतरुणास देणगी

❁ श्रीम. नम्रता मल्हार देसाई (पूर्वाश्रमीच्या विजया मोतीराम नवलकर) यांचे दिनांक २०-०६-१२ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या बहिणी रजनी, उषा, शीला आणि शोभा यांचेकडून रु.५००/-

❁ सौ. उषा अरुण जयकर यांजकडून नात कु. नेहा रोहित जयकर बी. टेक. झाल्याबद्दल रु.२५१/-

## अभिनंदन

ॲड. सदाशिव धुरंधरांपासून सर्व धुरंधर कुटुंबीयांचे प्रभुतरुण बोर्डाच्या कार्याला 'घरचे कार्य' मानून चालण्याचे वळण. तोच वारसा त्यांचे चिरंजीव श्री. बन्सीधर धुरंधर चालवतात.

प्रभुतरुण परिवारातल्या युवापिढीचे ते बन्सीकाका. अत्यंत कर्तृत्ववान. जगभर हिमतीने पसरवलेला समृद्ध असा स्वत:चा उद्योग. त्याच्या कितीतरी शाखा. त्यासाठी जगभर प्रवास. शिवाय 'पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन'चे ते विश्वस्त. 'रोटरी क्लब'चे अध्यक्ष म्हणून कारकीर्द. पण तरीही 'प्रभुतरुणा'च्या 'घरच्या कार्या'ला त्यांच्या लेखी नेहमीच मानाचे पान असते. प्रभुतरुणाचे कार्यशील विश्वस्त ते आहेतच. म्हणूनच परिवारातील एक जाणते म्हणून नेमका सल्ला ते देतात. मार्गदर्शन करतात. युवा कार्यकर्त्यांच्या उत्साहाला खतपाणी घालतात. काहीवेळा या कार्यकर्त्यांच्या मनात असलेल्या रास्त असंतोषाला वेळीच बांध घालतात. हा बांध ते घालू शकतात कारण या युवापिढीला चांगल्या कामात प्रोत्साहन देणे, त्यांचे कौतुक करणे हा बन्सीकाकांचा आनंद असतो. या बन्सीकाकांचे संवादकौशल्य वाखाणण्याजोगे आहे. त्यांचे वक्तृत्वही तसेच प्रसन्न शैलीने बहरत जाणारे. ते चित्रे सुंदर काढतात. रांगोळी सुंदर रेखतात. आयोजन छान करतात. मैत्री जपतात. माणसं साठवतात.

असे श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर हे वृत्तीने सदातरुण, निरोगी असणारे आमचे विश्वस्त २५ जुलै २०१२ रोजी वयाची साठी पूर्ण करताहेत. त्यांना प्रभुतरुण परिवारातर्फे मन:पूर्वक शुभेच्छा!

## पाठारे प्रभु महिला समाज

समाजाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १२ ऑगस्ट २०१२ रोजी प्रभु सेमिनरी शाळेचे सभागृह, भाई जीवनजी लेन येथे ४.०० वाजता आयोजित केली आहे. त्याचदिवशी खालील स्पर्धा घेण्यात येतील.

**स्मरणशक्ती स्पर्धा-** स्टेजवर ठेवलेल्या वस्तू पाहून पाच मिनिटात वस्तूंची नावे लिहिणे.

**वक्तृत्व स्पर्धा-** (मराठी) सभासद महिलांसाठी- विषय: मोबाईलचे फायदे-तोटे. मुलींसाठी-(वयोगट १५ वर्षांखालील) विषय: माझी महत्त्वाकांक्षा (माय ॲंबिशन)

**वक्तृत्व स्पर्धा-** (हिंदी) महिलांसाठी- विषय: मेरी मनपसंद सिरीयल.

**फॅन्सीवर्क स्पर्धा-** महिलांसाठी- विषय: क्रोशाने केलेले दरवाज्यावरील लोकरीचे तोरण (माप ३ x ६) सूचना- कलाकृती स्पर्धेच्या ठिकाणी करणे.

शुक्रवार दिनांक २४ ऑगस्ट २०१२ रोजी ४ वाजता पाठारे प्रभु सोसायटीच्या सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात, (१२वा रस्ता, खार) येथे अधिक मासानिमित्त हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात येईल. त्याच दिवशी फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात येतील. (सभासद महिलांसाठी) व (मुलींसाठी वयोगट १५ वर्षांखालील). त्याशिवाय सौ. शुभांगी सावरकर यांचा एकपात्री नाट्यप्रयोग 'मी सावित्रीबाई फुले बोलतेय' सादर करण्यात येईल.

रविवार दिनांक १५ एप्रिल २०१२ रोजी निबंधस्पर्धा व काव्यस्पर्धा घेण्यात आल्या. त्यांचा निकाल पुढीलप्रमाणे-

**निबंधस्पर्धा-** महिलांसाठी- विषय: माझे आहारनियंत्रण (डायटिंग)
प्रथम क्रमांक- सौ. स्वप्ना विनित जयकर,
द्वितीय क्रमांक- सौ. पल्लवी परेश कोठारे,
तृतीय क्रमांक- सौ. वैदेही राकेश राणे

**काव्यस्पर्धा-** विषय: झोका (काव्य घरून लिहून आणणे)
प्रथम क्रमांक- सौ. भारती नैषद विजयकर, द्वितीय क्रमांक- सौ. सुजाता रामनाथ कोठारे, तृतीय क्रमांक- सौ. वैदेही राकेश राणे

वरील स्पर्धांचे परीक्षण श्रीमती रजनी नाईक व सौ. अपर्णा बेडेकर या भगिनींनी केले.

## परीक्षेतील सुयश

**बारावी (विज्ञान)**
श्री. सिद्धांत समीर धुरंधर, ५०%
**बारावी (कला)**
कु. ऐश्वर्या अमर अजिंक्य ७०.७%
**बारावी (वाणिज्य)**
कु. तन्मयी सचिन विजयकर, ८०%
श्री. प्रथमेश राजेश धुरंधर, ८०%
कु. शिवानी सुनील नवलकर, ७०%
श्री. अमोल अमीत धैर्यवान, ७०%
कु. प्रियांका अजित नवलकर, ५६%
**बी. कॉम.**
कु. पायल दिलीप नवलकर, ७३%
श्री. योगेश अभय मानकर, ८०%
कु. विनीता महेश कोठारे ७१%
**आयसीएफसी**
कु. केआ नितीन मानकर ९३.८%
**आयसीएसई**
श्री. समीर सुदेश राणे, ८७%
कु. सीमरन मनीष धैर्यवान ८४%
**बी. टेक.**
कु. नेहा रोहित जयकर ७५%


*॥ श्री इंद्रायणीप्रसन्न ॥* *॥ श्री गुरुदेव दत्त ॥*

**प्रकाश कॅटरर्स**

*शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!*
*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम स्वाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*
*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो.*
*खारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८



**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४


## प्रभुतरुणाची डायरी

### नारळ साखर दिला

२४-०४-१२ डॉ. श्री. विद्याधर सुनील आगासकर, कु. स्नेहल शिरीष कोठारे

### नांदा सौख्यभरे

२४-०६-१२ कु. वैजयंती अशोक कीर्तिकर, श्री. जयेश प्रेमप्रकाश सक्सेना (आं. ज्ञा.)
२८-०६-१२ कु. प्रियांका प्रवीण जयकर, श्री. वैभव विलास गुप्ते (आं. ज्ञा.)

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २७-०६-१२ | श्रीम. नम्रता मल्हार देसाई | वय ७९ | धसवाडी |
| ०२-०७-१२ | श्री. शशांक मोहन तळपदे | वय ४९ | मालाड |


**वलय प्रतिष्ठान लवकरच घेत आहे-**
**शोध पाठारे प्रभु IDOL चा.**
त्वरा करा!
**Auditions!**
१ सप्टेंबर- शनिवार
दुपारी २ वाजल्यापासून
स्थळ: पाठारे प्रभु हाऊसिंग सोसायटी, खार
वयोगट: १५ ते ४५ नोंदणी आवश्यक
फॉर्मसाठी संपर्क: ९८२०२३१७४२
**-पूजा अजिंक्य**


## सखीच्या अंगणात

**-सुहासिनी सुहास कोठारे**

माहेर म्हटले की आईवडील, भाऊबहीण अशी सर्व नाती डोळ्यासमोर येतात. वयपरत्वे आपणही वयस्क होत जातो व आई, आजी अशी नाती सुरू होतात. वयाने कितीही मोठे झालो तरी प्रत्येक स्त्रीला माहेरची ओढ कायमच असते. माहेरी राहून जुन्या मैत्रिणींना भेटून खूप आनंद होतो. पुढे कधीतरी आईवडील नसतात पण भाऊ भावजय माहेरपण करीत असतातच. पण एक मैत्रीण सर्व मैत्रिणींना घरी बोलावून साग्रसंगीत माहेरपण करते हे मी अनुभवले आहे.

आम्ही सातजणी लहानपणापासून एकाच शाळेतील व शाळा सुटून ५२ वर्षे झालेली. तरीही नेहमी एकत्र भेटून कुठेतरी सहलीला जातो. यावर्षी मात्र सौ. आशाने तिच्याच घरी येण्याचे सांगितले. त्याप्रमाणे आम्ही सर्वजणी एक दिवस तिच्याकडे दादरला गेलो. तिच्याकडे गेल्यावर तिथे ती अशी काही सरबराई करते; काही विचारू नका. आमच्या सर्वांच्या पसंतीचेच तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ ती करून आम्हाला खाण्यास देते. आम्ही मदत करू म्हटले तरी ऐकत नाही. सर्व स्वत:च करणार म्हणत असते. फणसाची भाजी, टोमॅटोसार, नाचणीची भाकरी, कोथिंबीरवडी असे अनेक तऱ्हेचे सर्व पदार्थ. शिवाय मांसाहार खाण्यासाठी चिकन, सुरमई तळलेली हे पदार्थसुद्धा ती आम्हाला आग्रह करून खाण्यास देते. अशा सर्व पदार्थांवर ताव मारल्यानतर संध्याकाळी शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर बसून जुन्या आठवणींचे कप्पे उघडत जातात. परत तिच्या घरी आल्यानंतर पाऊस पडत असेल तर लगेच आशाची गरमागरम कांद्यांची भजी करावयास सुरुवात आणि पाऊस नसेल तर आम्हा म्हाताऱ्यांसाठी तिच्या घराबाहेर असलेल्या बर्फाच्या गाडीतील बर्फाचा गोळा असे आम्हा मैत्रिणींचे ती लाड करत असते.

एवढे करून काही कमी पडते म्हणून की काय दुसरे दिवशी घरी जाताना आम्हा माहेरवाशीणींना एखादी वस्तू व नातवंडासाठी तिने स्वत: केलेली चॉकलेट देण्याकरिता विसरत नाही. हे सर्व पाहून गहिवरून येते. यापुढे आम्ही असे प्रत्येकाच्याकडे माहेरपण करावयाचे ठरविले आहे.

कवीनी म्हटले आहे- देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे, घेताघेता देणाऱ्याचे हात घ्यावे.

✳